नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - १४० | Issue - 140 | वार रविवार दि. ६ ऑक्टोबर २०२४ | Blow- Sunday Date 6 October 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## हरियाणात भाजपाची हॅटट्रिक चुकणार; १० वर्षांनी काँग्रेस सत्तेत येण्याची शक्यता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : हरियाणा राज्यात आज (५ ऑक्टोबर) विधानसभेच्या ९० जागांसाठी एकाच टप्प्यात मतदान पार पडलं. ८ ऑक्टोबर रोजी विधानसभेचा निकाल समोर येणार आहे. मात्र, त्याआधी आज एक्झिट पोल समोर आले आहेत. भाजपा आणि काँग्रेसमध्ये या निवडणुकीत जोरदार रस्सीखेच पाहायला मिळाली होती, तर भाजपामधील अनेक नेत्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. त्यामुळे या निवडणुकीकडे देशाचे लक्ष लागले होते. आता या निवडणुकीचे एक्झिट पोल समोर आले आहेत.




पीमार्कच्या एक्झिट पोलनुसार, हरियाणात काँग्रेसला ५१ ते ६१ जागा आणि भारतीय जनता पक्षाला २७ ते ३५ जागा मिळण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. तसेच पीपल्स पल्समध्ये काँग्रेसला ४९ ते ६१ जागांवर तर भाजपा २० ते ३२ जागांवर आघाडीवर दाखवलं आहे. तसेच एनडीटीव्हीच्या पोलनुसार काँग्रेसला ५५ आणि भाजपाला २५ जागा मिळू शकतात. तसेच इंडिया टीव्हीच्या पोलनुसार काँग्रेसला ४४ ते ५४ जागा आणि भाजपाला १९ ते २९ जागा मिळण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

हरियाणा विधानसभेसाठी मतदान पार पडल्यानंतर आज एक्झिट पोल समोर आले आहेत. विविध एक्झिट पोलच्या आकडेवारीनुसार हरियाणात भाजपाला धक्का बसण्याची शक्यता आहे, तर २०१४ आणि २०१९ साली काँग्रेस सत्तेपासून दूर राहिली होती. मात्र, यावेळी हरियाणात काँग्रेसला एक्झिट पोलच्या आकडेवारीनुसार जास्त जागा मिळत असल्याचे दिसून येत आहे.

निवडणूक निकालाचे अंदाज व्यक्त करण्याची अनेक माध्यमं असून त्यातील सर्वात विश्वासार्ह माध्यम म्हणून एक्झिट पोलकडे पाहिलं जातं. कारण एक्झिट पोल तंतोतंत नसला तरी निकालाच्या जवळपास जाणारा असतो. एक्झिट पोल हा निवडणुकीचा सर्व्हे असतो. हा सर्व्हे मतदानाच्या काळात केला जातो. वेगवेगळ्या संस्था हा सर्व्हे करत असतात. त्या सर्व्हेच्या आधारे कोणत्या पक्षाला किती जागा मिळतील? याचा अंदाज बांधला जातो. याबरोबरच कोणत्या पक्षाचे किती उमदेवार जिंकणार याचा अंदाज काढला जातो.

## मालेगावातून एनआयएच्या छाप्यात तीन संशयित ताब्यात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**





नाशिक : दहशतवादी संघटना 'जैश-ए-मोहम्मद'ला आर्थिक रसद पुरवल्याच्या संशयावरून राष्ट्रीय गुप्तचर यंत्रणेने (एनआयए) महाराष्ट्रासह देशातील पाच राज्यांत २२ ठिकाणी कारवाई करून संशयितांना ताब्यात घेतले. त्यामध्ये महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यातील मालेगाव येथील होमिओपॅथी क्लिनिकमधील एका डॉक्टरसह दोघांचा समावेश आहे. सन २०२२मध्ये मालेगावातून 'पीएफआय'द्वारे देशविघातक कृत्यांचे आराखडे तयार झाल्यानंतर आता 'टेरर फन्डिंग'चा प्रकार उघड होत आहे. 'एनआयए'ने शनिवारी मध्यरात्रीपासून महाराष्ट्रासह दिल्ली, जम्मू-काश्मीर, उत्तर प्रदेश व आसाम या पाच राज्यांतील २२ ठिकाणी एकाचवेळी छापे टाकले. दहशतवादी संघटना 'जैश-ए-मोहम्मद'ला आर्थिक पाठबळ दिल्याच्या संशयावरून ही कारवाई झाली. २ ऑक्टोबर रोजी राजस्थानातील आठ रेल्वे स्थानकांवर बॉम्बने उडविण्याची धमकी मिळाली होती. त्यावेळी तपास यंत्रणांना 'जैश-ए-मोहम्मद'च्या कमांडरच्या नावे चिठ्ठी मिळाली होती. त्या तपासानुसार ही छापेमारी झाल्याचे कळते. 'एनआयए'ने मालेगावातील पवारवाडी रस्त्यावरील अब्दुल्लानगरातील होमिओपॅथी क्लिनिकमधून तिघांना ताब्यात घेतले. शनिवारी पहाटे ३ वाजेपासून या तिघांची सुरू झालेली चौकशी रात्री उशिरापर्यंत सुरू होती.

दरम्यान, मालेगावसह जालना व छत्रपती संभाजीनगरातूनही एकाला ताब्यात घेण्यात आले. यासह जम्मू-काश्मीरच्या बारामुल्लामध्ये एकाला ताब्यात घेतले. तर ईशान्य दिल्लीतील मुस्तफाबादमधून दोघांना ताब्यात घेत संशयास्पद साहित्य जप्त करण्यात आले.

## थोडक्यात

### पाकिस्तानबरोबर द्विपक्षीय चर्चा नाही : जयशंकर

नवी दिल्ली : परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी आपण पाकिस्तान दौऱ्यामध्ये कोणाशीही द्विपक्षीय चर्चा करणार नाही असे शनिवारी स्पष्ट केले. जयशंकर शांघाय सहकार्य संघटनेच्या (एस-सीओ) परिषदेसाठी १५ आणि १६ ऑक्टोबरला इस्लामाबादला जाणार असल्याची घोषणा परराष्ट्र विभागाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी केली.



जयशंकर यांच्या रूपाने तब्बल नऊ वर्षांनी भारताचे परराष्ट्रमंत्री पाकिस्तानला जाणार आहेत. दोन्ही देशांदरम्यानच्या तणावपूर्ण संबंधांच्या पार्श्वभूमीवर या दौऱ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे या दौऱ्यात ते पाकिस्तानच्या नेत्यांशी द्विपक्षीय चर्चा करणार का याकडे सगळ्यांचे लक्ष आहे. मात्र, आपण तेथे बहुपक्षीय परिषदेसाठी जात आहोत, द्विपक्षीय चर्चेसाठी नाही, असे जयशंकर यांनी येथे एका कार्यक्रमात सांगितले. दरम्यान, यापूर्वी दिवंगत सुषमा स्वराज यांनी डिसेंबर २०१५मध्ये पाकिस्तानला भेट दिली होती. गेल्या वर्षी एससीओ परिषदेच्या निमित्ताने पाकिस्तानचे तत्कालीन परराष्ट्रमंत्री बिलावल भुत्तो झरदारी यांनीही भारताचा दौरा केला होता.

## आर्थिक वादातून झालेल्या मारहाणीत तरुणाचा खून

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : शहरातील विजापूर नाका परिसरात राहणारा २१ वर्षीय तरुणाला शुक्रवारी (दि.४) ऑक्टोबर रोजी आठ ते दहा जणांनी जबर मारहाण केली. यात तो गंभीर जखमी झाला. त्याला उपचारासाठी शहरातील अश्विनी हॉस्पिटल येथे दाखल केले. परंतु शनिवार पाच ऑक्टोबर रोजी त्याचा उपचाराचा मृत्यू झाला. या घटनेची नोंद विजापूर नाका पोलीस ठाण्यात झाली आहे.

दरम्यान मिळालेल्या माहितीनुसार,अथर्व दिनेश जाधव (वय-२०, रा.०३ सरस्वती बिल्डिंग,अमृत नगर, विजापूर रोड) असे मृताचे नाव आहे. याप्रकरणी मृताचे वडील दिनेश प्रकाश जाधव (वय-५०-,व्यवसाय खाजगी नोकरी,रा. ०३ सरस्वती बिल्डिंग,अमृत नगर,विजापूर रोड) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून इंडियन मॉडेल इंटरनॅशनल शाळेच्या पाठीमागे रेणुका नगर येथील मोकळ्या मैदानात व तेथेच असणाऱ्या पत्र्याच्या शेडमध्ये सोलापूर ते अश्विनी हॉस्पिटल दरम्यान अथर्व जाधव यास पैशाच्या देण्याघेण्याच्या व्यवहारातून आठ ते दहा जणांनी मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक गायकवाड हे करीत आहेत.

प्रसाद लोंढे,बाळू काळे,सागर कदम,केदार गुमटे,मनोज सूर्यराव उर्फ भाईजी,अजिंक्य शाबादे,प्रकाश शिंदे उर्फ बुद्धा,जॉकी थोरात,विनायक जाधव व त्यांचे इतर साथीदार यांच्या विरोधात विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. अत्यंत जखमी अवस्थेत अथर्वला तातडीने शहरातील अश्विनी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी आणण्यात आले. मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.अथर्वच्या पश्चात वडील, आई, बहीण असा परिवार आहे.वाद पैशाच्या व्यवहारातून झाला आहे. अथर्वच्या घटनेची माहिती मिळाल्यानंतर नातेवाईक मोठ्या प्रमाणामध्ये अश्विनी हॉस्पिटलमध्ये दाखल झाले होते.अथर्वच्या मृत्यूने एकच आक्रोश हॉस्पिटल परिसरात झाला.

## विकासकामे थांबवणाऱ्यांना सत्तेपासून लांब ठेवा : पंतप्रधान मोदींचा हल्लाबोल



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे/मुंबई : विधानसभेची निवडणूक तोंडावर आली आहे. काही दिवसांमध्ये निवडणूक जाहीर होणार आहे. त्यामुळे राज्यात अनेक राजकीय घडामोडींना वेग आला आहे. सर्वच पक्षांनी मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे. आचारसंहिता लागण्याच्या आधी नेत्यांनी विविध विकासकामांच्या उद्घाटनांचा धडाका लावला आहे. या पार्श्वभूमीवरच पंतप्रधान नरेंद्र मोदी आज महाराष्ट्र दौऱ्यावर आहेत. यावेळी पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते ठाण्यात विविध विकास कामांचं उद्घाटन पार पडलं. यावेळी बोलताना त्यांनी महाविकास आघाडीवर हल्लाबोल केला. महाविकास आघाडीने विकासकामे रोखण्याचा प्रयत्न केला, पण आता विकासकामे थांबवणाऱ्यांना सत्तेपासून लांब ठेवण्याचं काम करा, असं पंतप्रधान मोदी यांनी म्हटलं आहे.

आज एक मोठी आनंदाची बातमी घेऊन महाराष्ट्रात आलो आहे. केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. हा फक्त महाराष्ट्राचा आणि मराठीचा सन्मान नाही तर मराठी साहित्य कला आणि संस्कृतीचा देखील सन्मान आहे. मी देशातील सर्व मराठी बोलणाऱ्यांना शुभेच्छा देतो. ठाण्यात येण्याच्या आधी मी वाशिममध्ये होतो. त्या ठिकाणी नऊ कोटी शेतकऱ्यांना किसान सन्मान निधी जारी करण्याचा योग मला प्राप्त झाला. आजच्या दिवसाची अनेक लोक वाट पाहत होते, असं मोदी म्हणाले. आम्हाला विकास कारायचा आहे आणि याआधी काँग्रेसने केलेल्या खड्यांनाही भरायचं आहे. विकसित भारत हे एनडीए सरकारचं लक्ष्य आहे. असे अनेक काम आहेत ते आम्ही मार्गी लावले आहेत. आमच्या सरकारने ही स्थिती बदलण्याचा प्रयत्न केला आहे. महाराष्ट्र विकासाच्या वाटेवर नेण्याचं काम केलं आहे. असे अनेक प्रकल्प आहेत ते आम्ही मार्गी लावले आहेत. आता ते जर मोजायला गेलो तर दिवस कमी पडेल, असं म्हणत पंतप्रधान मोदी यांनी काँग्रेसवर टीका केली. पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले, महाविकास आघाडीला संधी मिळाली की ते विकासाचे काम थांबवण्याचे काम करतात. मुंबई मेट्रो हे देखील त्याचच एक उदाहरण आहे. महाविकास आघाडीला फक्त विकास थांबवण्याचं काम येतं. मात्र, विकासकाम थांबवणाऱ्यांना आता सत्तेपासून लांब ठेवा. महाविकास आघाडी जोपर्यंत सत्तेत होती, तोपर्यंत अनेक प्रकल्पाचं काम थांबवलं. अडीच वर्ष काम थांबवल्यामुळे मेट्रोचा खर्च १४ हजार कोटींनी वाढला. मग हे पैसे कोणाचे होते? सर्व सामान्य नागरिकांनी भरलेला टॅक्सचे होते, असा हल्लाबोल पंतप्रधान मोदी यांनी महाविकास आघाडीवर केला.

## महाराष्ट्रात निवडणुका डोळ्यासमोर ठेवून योजना राबविल्या जातात, त्यामुळे राज्यावर ९ लाख कोटींचे कर्ज : जयंत पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सावंतवाडी : महाराष्ट्रात निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून नवनवीन योजना आणल्या जात आहेत पण योजना पूर्ण करायला यांच्याकडे पैसे नसल्यानेच आता रिझर्व्ह बँकेकडे सव्वालाख कोटीचे कर्ज मागितले आहे. त्यामुळेच निवडणुका लवकर लागल्या पाहिजे अन्यथा महाराष्ट्रावर नऊ लाख कोटींचे कर्ज होईल आणि ते आपणास परवडणारे नाही, त्यामुळे महाराष्ट्रातील सरकार घालवा आणि सर्वसामान्यांचे सरकार आणा असे आवाहन राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष आमदार जयंत पाटील यांनी केले.

शिवस्वराज्य यात्रेनिमित्त शनिवारी शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस गटाची जाहीर सभा सावंतवाडीतील गांधी चौकात पार पडली. यावेळी खासदार डॉ. अमोल कोल्हे, युवक अध्यक्ष सुनिल गव्हाणे, माजी मंत्री प्रविण भोसले, आदी उपस्थित होते.

पाटील म्हणाले, आतापर्यंतच्या इतिहासात विद्यमान सरकारमध्ये चालला तसा भ्रष्टाचार जनतेने कधीच पाहिला नव्हता. इव्हेंटचे सरकार झाले आहे. लाडकी बहीण योजना आणली, पण बहीण सुरक्षित राहिली तरच योजना चालणार पण सांगणार कोण? महिला सुरक्षा महत्त्वाची आहे. फक्त राज्यावर कर्जाचा डोंगर उभा राहात आहे, आता नव्या योजनांसाठी सव्वालाख कोटींचे कर्ज मागितले आहे. त्यामुळे निवडणुका लवकर झाल्या पाहिजेत कर्ज, घ्यायचे तरी बंद करतील, नाहीतर राज्यावर नऊ लाख कोटींचे कर्ज होईल, अशी भिती पाटील यांनी व्यक्त केली.

**शेतकऱ्यांसाठी दिवसा वीज पुरवठ्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शुभारंभ**

## जगातील सर्वात मोठा १६ हजार मेगावॅटचा विकेंद्रित सौर ऊर्जा प्रकल्प

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई /प्रतिनिधी : शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी राज्यात उभारण्यात येणाऱ्या १६ हजार मेगावॅट क्षमतेच्या जगातील सर्वात मोठ्या विकेंद्रित सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पाच्या पहिल्या पाच सोलर पार्कचे लोकार्पण मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शनिवारी वाशिम जिल्ह्यात पोहरादेवी येथे करण्यात आले.

मा. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मा. केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान, केंद्रीय पंचायत राजमंत्री राजीव रंजन ऊर्फ ललन सिंह, मा. उपमुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री देवेंद्र फडणवीस, मा. उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव, महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन, जलसंधारणमंत्री तथा पालकमंत्री संजय राठोड व कृषीमंत्री धनंजय मुंडे यावेळी उपस्थित होते.

**शेतकऱ्यांना कृषी पंपांसाठी सध्या दिवसा व रात्री असा दोन पाळ्यांमध्ये वीज पुरवठा करण्यात येतो. केवळ दिवसा भरवशाचा वीज पुरवठा करावा अशी त्यांची मागणी आहे. पीएम कुसुम अर्थात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० मुळे शेतकऱ्यांची मागणी पूर्ण होणार आहे. या योजनेत सौर ऊर्जा निर्मितीसाठी दरवर्षी सव्वा लाख रुपये प्रती हेक्टर दराने जमीन भाड्याने देण्याचीही सुविधा शेतकऱ्यांसाठी आहे. या योजनेमध्ये खासगी गुंतवणूकदारांकडून एकूण ६५ हजार कोटी रुपये गुंतवणूक होणार असून ग्रामीण भागात ५० हजार रोजगारनिर्मिती होणार आहे. सध्याच्या साडे आठ रुपये प्रती युनिट दराच्या ऐवजी सरासरी ३ रुपये प्रती युनिट इतक्या किफायतशीर दराने वीज उपलब्ध होणार असल्याने वीज खरेदीमध्ये दरवर्षी १० हजार कोटी रुपयांची बचत होईल. परिणामी राज्य सरकारवरील वार्षिक ४५०० कोटी रुपये अनुदानाचा व उद्योगांवरील वार्षिक १३ हजार कोटी रुपयांचा क्रॉस सबसिडीचा बोजा दूर होईल. तसेच हरित ऊर्जेचा वापर केल्यामुळे पर्यावरण रक्षणाला मदत होईल.**


कृषी फीडर्सना सौर ऊर्जेद्वारे निर्माण केलेल्या विजेचा पुरवठा करण्यासाठी केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री किसान ऊर्जा सुरक्षा एवं उत्थान महाभियान अर्थात पीएम कुसुम योजनेच्या आधारे राज्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० योजना राबविण्यात येत आहे. त्यामध्ये ९२०० मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारणीचे काम सध्या सुरू असून ते टप्प्या टप्प्याने सप्टेंबर २०२५ पर्यंत पूर्ण होणार आहे. त्यापैकी धोंदलगाव (जिल्हा छत्रपती संभाजीनगर), बामणी बुद्रक (जिल्हा नांदेड), हरोली (जिल्हा कोल्हापूर), जलालाबाद (जिल्हा अकोला), पलशी बुद्रुक (जिल्हा बुलढाणा) या एकूण १९ मेगावॅट क्षमतेच्या पहिल्या पाच प्रकल्पांचे लोकार्पण आज झाले. सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारणीस मदत करणाऱ्या ४११ ग्राम पंचायतींना मा. पंतप्रधानांच्या हस्ते २०.५५ कोटी रुपये विकासनिधी ऑनलाईन पद्धतीने देण्यात आला.



याखेरीज ४८०० मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पांच्या उभारणीसाठी टेंडर प्रक्रिया पूर्ण झाली असून त्यांचे कार्यादेश देण्यात आले आहेत. एकूण १६ हजार मेगावॅट क्षमतेचे सर्व प्रकल्प मार्च २०२६ पर्यंत पूर्ण होऊन राज्यात शेतीसाठी पूर्णपणे सौर ऊर्जेवर निर्माण झालेल्या विजेचा पुरवठा होईल. या योजनेत एकाच हेतूने राज्यात विविध ठिकाणी सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारण्यात येत असून अशा विकेंद्रित स्वरुपातील हा जगातील सर्वात मोठा सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प आहे. योजनेच्या अनुषंगाने राज्यात शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र वीजनिर्मिती कंपनी स्थापन करण्यात आली आहे.

राज्य सरकारने एप्रिल २०२३ मध्ये मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ला मंजुरी दिल्यानंतर राज्याचा ऊर्जा विभाग आणि महावितरणने केवळ अकरा महिन्यात ४० हजार एकर सार्वजनिक जमीन उपलब्ध करणे, सौर ऊर्जा निर्मितीसाठीची टेंडर प्रक्रिया पूर्ण करणे, वीज खरेदीचे करार करणे, वीज उपकेंद्रांची क्षमता वाढविणे आणि विकसकांना ९२०० मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा निर्मितीची लेटर ऑफ वॉर्ड देणे ही कामे केली. विकसकांना आदेश दिल्यानंतर केवळ सहा महिन्यात त्यापैकी १९ मेगावॅट क्षमतेचे पाच प्रकल्प सुरू झाले. या प्रकल्पांचे लोकार्पण मा. पंतप्रधानांच्या हस्ते आज झाले.

# नैसर्गिक सौंदर्याने नटलेली कोकणची पुण्य भूमी आणि मी स्वत: अनुभवलेली गोड कोकणी माणसं




जवळजवळ दोन एक वर्षांपूर्वी मी कोकणावरती, आपली काही काळ कर्मभूमी असलेल्या दापोली वरती एक लेख लिहिला होता.... गेल्या काही दिवसापासून पुन्हा एकदा कोकणाबद्दल काहीतरी लिहावं अशी भावना मनामध्ये सतत उफाळून येत होती.

आपण ज्या भागात, ज्या मातीत जन्माला येतो, ती माती आपल्याला आपल्या माते समान प्रिय वाटते. तिच्याबद्दल आपल्या मनामध्ये प्रचंड प्रेम, अभिमान ,स्वाभिमान हे आतप्रोत भरलेल असत.वेगवेगळ्या भूखंडाची अथवा वेगवेगळ्या प्रदेशाची भावनिकदृष्ट्या तुलना ही होऊच शकत नाही. प्रत्येक ठिकाण हे आपल आपल वेगळेपण जपत आपापल्या ठिकाणी सर्वश्रेष्ठ असतं .आपण काही कामानिमित्त ज्या देशात, ज्या प्रदेशात, ज्या भागात वास्तव्य करतो त्या प्रदेशाबद्दल, तेथील माणसांबद्दल आपल्या मनामध्ये कळत नकळत एक आदरभाव, आपुलकी निर्माण होत असते. ती मातीही आपल्याला प्राणप्रिय वाटू लागते. मग आपोआपच तिच्याबद्दलच्या भावना या मनामध्ये घर करून राहतात व मनातील भावना या शब्द रूपामध्ये अशा आपोआप ओसंडून वाहू लागतात. मग कळत नकळत पेन हातामध्ये घेऊन ते अशा प्रकारे शब्दबद्ध केल्याशिवाय माणसाला चैनच पडत नाही. कोकणामध्ये असताना जे जे पाहिलं ,जे जे अनुभवलं ते शब्दबद्ध करतोय. ज्या कोकण भूमीने शिवछत्रपतींच्या स्वराज्याला अभेद्यपण दिलं ,विस्तीर्ण पसरलेल्या अरबी समुद्रामध्ये प्रचंड आरमार उभारून परकीय मदमस्त सत्तापीपासू वृत्तीला ,सत्ताधीशांना वेसण घालून या स्वराज्याची प्रदीर्घ काळ सेवा केली त्या कोकण भूमीमध्ये काही काळ वास्तव्य करण्याचा योग मला आला. हे मी माझे परमभाग्य समजतो.कोकणाबद्दलच्या खूप गोड आणि रम्य आठवणी हृदयाच्या एका कप्प्यामध्ये साठऊन ठेवले आहेत. ती माझ्या जगण्याची प्रेरणा आहे. कोकणच्या निसर्गामध्ये गोडवा,पाण्यात गोडवा, माणसात गोडवा, हापूस आंब्यात गोडवा किंबहुना सगळ्यातच गोडवा हे मी माझ्या वास्तव्याच्या काळात मनसोक्त अनुभवलंय. म्हणून ते सारं आज शब्द रूपाने बाहेर पडते आहे. त्या भावनेतूनच मी हा लेख लिहिण्याचा प्रयत्न करत आहे . सदा सर्वकाळ हा कोकण सुंदर नयनरम्य भासतो. पण कोकणच्या सौंदर्यामध्ये सर्वात जास्त भर पडते ती पावसाळ्यामध्ये .पावसाळ्यामध्ये खूप ठिकाणी आकाशातील ढग हे उंच उंच डोंगरांच्या कडेवर बसून त्याच्याशी तासंतास हितगुज करत असतात.एकमेकांच्या सुखदुःखाच्या गप्पागोष्टी करत असताना, एकमेकींना गहिवरून येतं आणि कडेवर बसलेला ढगोबा हा त्या उंच उंच डोंगराला आपल्या अश्रूंनी न्हाऊ घालतो आणि ही डोंगरमाय त्या अश्रूंना अंतर्मनात खोलवर साठवून घेते .ती डोंगरमाय आपल्यामध्ये साठवून ठेवलेले अश्रूरुपी पाणी वर्षभर वृक्षांना, पानांना, फुलांना पक्षांना, प्राण्यांना पुरवत असते. आणि आकाशातून ढगोबा हे सार पाहून खूप आनंदित होतो आणि माझ्या अश्रूंची फुले झाली या भावनेने तो तृप्तीची ढेकर देतो. उंच उंच पर्वतांच्या कड्यावरून कोसळणाऱ्या जलधारा या दुधाप्रमाणे पांढऱ्या शुभ्र दिसतात. या धरणी मातेला दुग्धाभिसेक घालतात हा भास होतो. जिकडे पहाल तिकडे डोंगराच्या हिरव्यागार वनराईतून पांढरे शुभ्र धबधबे हे उंचावरून कोसळत असतात. तिथून ते धरणी मातेच्या आंगाखांद्यावर खेळत खेळत वेडीवाकडी वळणे घेत त्या अथांग अशा सागराची गळा भेट घेऊन, त्यात सामावून जातात. त्या सागराच्या भेटीसाठी अनिवार अपार वेगाने कोसळणाऱ्या धबधब्यामध्ये मित्रांसोबत आंघोळ करण्याची मजा ही काही औरच असते. कोकणातील नदीनाले हे आपल्या आजूबाजूचा निसर्ग, पशुपक्षी, प्राणी, माणूस या सर्वांच्या जीवनामध्ये समृद्धीचे सिंचन करत, त्यांना जलरूपी गोड अमृत पाजत, मंद पावलांनी ती अवाढव्य अश्या सागराच्या मिठीमध्ये प्रेम भरल्या नजरेने, मायने विसावते आणि तो सागर दादा तिला अतिशय प्रेमाने कुरवाळतो आणि ते दोन जीव एकरूप होऊन जातात. नारळ पोपळीच्या झाडासकट अनेक प्रकारची झाडे ही त्या उंच आकाशाला स्पर्श करण्याची स्पर्धा करत असतात. कोकणात प्रसिद्ध असलेल्या भातशेतीच्या बांधावरून जात असताना त्याचा तो सुवासिक वास मनाला प्रसन्न करतो.

भात शेतीतून स्वच्छंदपणे स्वैर करणारे लहान लहान ओढे एखादं गाणं गुणगुणत अलवारपणे पुढे पुढे सरकत असतात.कोकणामध्ये वास्तव्यास असताना छत्रपतींच्या पवित्र वास्तव्याने पुनीत झालेल्या दुर्गराज रायगडाला मित्रासमवेत भेट देता आले.तो पवित्र गड डोळ्यांनी न्याहाळताना शिवकाळातच आपण वावरत आहोत हा भास होत होता. शिवछत्रपतींच्या अतुलनीय शौर्याचे पराक्रमाचे प्रतीक असणारा, सह्याद्रीच्या डोंगर रांगांमध्ये अभिमानाने शिवछत्रपतींच्या पराक्रमाची कीर्ती सांगत उभा असलेला किल्ले प्रतापगड डोळ्यात साठवता आला.दापोली तालुक्यातील हर्णे समुद्रकिनाऱ्यावर असलेला सुवर्णदुर्ग किल्ला येणाऱ्या पिढ्यांना महाराजांची कीर्ती सांगण्यासाठी त्या बेफाम लाटांना टक्कर देत गेली साडेतीनशे वर्षांपासून अभेद्यपणे उभा आहे.दापोली तालुक्यातील उन्हवरे येथे निसर्गाचे अद्भुत चमत्कार असलेले गरम पाण्याचे झरे पाहता आले, त्यात मनसोक्त डुंबता आलं.पन्हाळेकाझीतील नदी किनारी असलेल्या सुंदर अशा पांडवकालीन लेण्या पाहून मन तृप्त झालं. गेल्या कित्येक वर्षापासून मासेमारीसाठी,पर्यटनासाठी प्रसिद्ध असलेल्या दाभोळ बंदरावरती कित्येक वेळा फिरता आलं.बोटीमधे बसून आनंद लुटता आल.अंजरले येथील प्राचीन कड्यावरच्या गणपतीला डोळ्यात साठवता आलं. श्री शिवछत्रपतींनी प्रत्यक्ष भेट देऊन दर्शन घेतलेल्या केळशेतील याकूब बाबा दर्यास भेट देऊन दर्शन घेता आले,साने गुरुजींचे पालगड, महर्षी कर्वे यांचे मुरुड, लोकमान्य टिळकांचे मूळ गाव चिखलगाव, स्वतः अनेक खस्ता खाऊन बाबासाहेबांच्या जीवनामध्ये प्रेमाचे, आपुलकीचे,जबाबदारीचे रंग भरणाऱ्या,त्यांच्या पत्नी माता रमाई यांच्या वणंद येथील स्मारकाला भेट देऊन मन तृप्त झाले. रमाबाईंच्या वंशज असलेल्यांशी चर्चा करताना मन भरून आलं.आपली संपूर्ण हयात शोषित, पीडित, वंचित जनसमुदायांच्या,अखिल मानव जातीच्या कल्याणाला समर्पित केलेले भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉक्टर.बाबासाहेब आंबेडकर यांचे मूळ गाव असलेले मंडणगड तालुक्यातील डोंगराच्या कुशीत वसलेल्या आंबवडे या गावी भेट देऊन तेथून प्रेरणा घेता आली. या पवित्र कोकण भूमीतून अतिरथी महारथीचा जन्म झाला. त्यांच्या त्या पवित्र ठिकाणावर, त्या स्फूर्ती स्थानावर माथा टेकवता आला.हे माझं परम भाग्य समजतो. या भूमीतील अनेक लेखक कवीनी आपल्या शब्द फुलांनी या भूमीला समृद्ध केल आहे. येथील लेखक कवींचा सुगंध संपूर्ण महाराष्ट्रभर नव्हे तर भारत देशभर दरवळत आहे. डॉक्टर बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ हे दापोलीच्या किंबहुना कोकणच्या शैक्षणिक सौंदर्यामध्ये भर घालते आहे. अनेक स्वतंत्र सैनिकांचे,भारतरत्नांचे, समाज सुधारकांचे, कलाकारांना शास्त्रज्ञांना खेळाडूंना जन्म देणारी कोकणची ही पवित्र भूमी शैक्षणिक क्षेत्रामध्ये देखील खूपच पुढारलेली आहे. येथील शैक्षणिक गुणवत्तेचा दर्जा अत्यूच्च आहे. कोकण आणि आपल्या या उर्वरित महाराष्ट्राला भौगोलिक दृष्ट्या विभाजित करणारी व या दोन्ही भागातील माणसांना एकाच भाषेत,चालीरीतीत,संस्कृतीत बांधून ठेवणारी, शिवछत्रपतींच्या स्वराज्याला अभेद्य अशी कवचकुंडल बहाल करणारी,अभेद्य अशी भिंत व अभेद्य असा दूवा म्हणजे सह्याद्रीची पर्वतरांग... ती गेले कित्येक शतके कोकण भूमीचं सौंदर्य डोळ्यांमध्ये साठवत, कुतूहलाने सर्व काही तिचं नांदणं पहात उभी आहे. साने गुरुजी यांनी श्यामची आई या पुस्तकामध्ये वर्णन केलेल्या दापोली तालुक्यातील माटवन वडवली, लाडघर, मुगीज यांच्यासह इतर परिसर हा डोळ्यांनी पाहता आला, त्यांनी चरणस्पर्श केलेल्या गावातून अनेक वेळा फिरता आलं. हे माझं परम भाग्य.समुद्राच्या खारट पाण्यामध्ये अनेक वेळा मनसोक्त डुंबता आल,त्या अवखळ समुद्राच्या लाटा अंगा खांद्यावर घेताना वेगळाच आनंद वाटायचा .कोकणच्या तांबड्या मातीने आणि तेथील माणसांनी केलेलं आमचं आदर मी आजन्म कधीच विसरू शकत नाही. माझ्यासोबत ड्युटी करणारे सहकारी चालक श्री परांजपे काका, श्री खाडे काका, श्री महाडिक काका, श्री कांदेकर अण्णा यांनी आम्हाला खूप सहकार्य केलं. कांदेकर अण्णा आणि महाडिक काका यांनी तर मुक्काम ड्युटी करत असताना डबा मला कधीच घेऊ दिला नाही. ते सतत म्हणायचे राहू दे रे चल.तू आमची आठवण ठेव. बस बाकी काय नको.परांजपे काका यांनी घरून बनवून आणलेला नास्था दाभोळच्या त्या बंदरावर बसून खाताना वेगळीच मजा यायची.ग्रामीण फेऱ्यावर ड्युटी करत असताना, दररोज गाडीमध्ये येजा करणाऱ्या माझ्या कोळी भगिनींनी मास्तर घेऊन जा थोडा म्हावरा म्हणत हक्काने मासे, सुकट देणाऱ्या त्या भगिनींना आणि रानभाजी विकणाऱ्या करवंद आंबा फणस विकणाऱ्या त्या भगिनीने दिलेले ते रानमेवा आणि त्यातील त्यांचं ते प्रेम मी जीवनभर कधीच विसरू शकत नाही.एस टी बस मुक्कामी जाण्याच्या ठिकाणी म्हणजे दापोली तालुक्यातील भोळवली ,वांजलोली, आतगाव ,आडे, भडवळे ओननवसे या गावातील बंधू भगिनींनी आमच्यावर पुत्रवत प्रेम केलं. मंडणगड तालुक्यातील भोळवली या गावी एसटी बस मुक्कामी थांबत .तेथील एका घरामध्ये आमच्या राहण्याची व्यवस्था होत असे,त्या घरात आजी आजोबा दोघेच राहत होते. त्यांची मुलं ही कामानिमित्त मुंबईला राहायची. ते आजी आजोबा आम्ही मुक्कामी जाईपर्यंत जेवत नसत.आम्ही गेल्यानंतर आमच्या सोबत जेवायला बसत.गरम नाचणीची, तांदळाची भाकरी, भात आमच्यासाठी वाढत असत. कधी कधी खास आमच्यासाठी माशाची भाजी करत, आंब्याच्या सीझनमध्ये आंबे देत.थंडी दिवसामध्ये आम्हाला गरम पाणी तापउन देत.आम्ही काय दिलं हो त्यांना? काहीच नाही. मग या माणसानी आमच्यावर इतकं प्रेम केलं. इतकी काळजी घेतली. त्यावेळेस त्यांच्या माझ्या मध्ये झालेले संवाद,त्यांच्याशी केलेल्या गप्पागोष्टी आज देखील माझ्या कानात, मनात,हृदयात जसेच्या तसे साठवून ठेवले आहेत.ते आजी आजोबा माझ्या शेवटच्या श्वासापर्यंत माझ्यापासून दूर जाऊ शकत नाहीत. अशी ही कोकणची माणसं आणि त्यांची ती माया. त्या माऊलीने आपल्या घासातील घास मला स्वतःचा मुलगा समजून भरवलं ना हो. आत्ता त्यांचा सहवास भेटत नाही, तो भविष्यातही भेटू शकत नाही ही मनामध्ये खंत आहे .पण पूर्वी भेटलेल्या त्यांच्या सहवासाच्या शिदोरीवर जीवनभर त्यांना आठवत राहू.

खरंतर कोकणी माणसं आणि त्या मातीने आम्हाला भरभरून प्रेम दिल. आज आम्ही मूळ गावी आहोत. पण आम्हाला त्यांनी दिलेलं प्रेम हे मी आजन्म कधीच विसरू शकत नाही. दापोली शहर व तालुक्यातील माझी असंख्य मित्रमंडळी आहेत,काही माझे सहकारी कर्मचारी आहेत त्यांची आपल्या अक्कलकोटच्या स्वामी महाराजांवर अपार श्रद्धा. ती लोक कधी कधी दर्शनाला येतात.तिथून निघण्यापूर्वी मला फोन लावतात आणि विचारतात काय रे एम.डी(ते मला एम. डी .म्हणतात)तू आहेस कुठे ?मी म्हणतो अक्कलकोटला. तर मग आमचे एक काम करशील?मी त्यांना म्हणतो तुम्ही हजार काम सांगा तुमच्यासाठी करेन मी. तसं नाही रे बाबा... आम्ही कुटुंबासोबत, मित्रासोबत श्री.स्वामींच्या दर्शनाला येणार आहोत. तेवढी फक्त रूमची शोधाशोध करून ठेव.आम्ही तुला फोन पे करतोय. त्यांना ऍडव्हान्स देऊन ठेव. बाकी काय नाय.मग मी म्हणतो एवढेच ना? तुम्ही बिनधास्त या. मी करतो. मग ती लोक येतात दर्शनासाठी. माझ्या ड्युटी मुळे कधी त्यांच्याशी भेट होते, कधी होत नाही. पण त्यांच्यासाठी रूम पकडून ठेवतो. योगायोगाने त्यांची माझी भेट झालीच तर एकमेकांना कडकडून मिठी मारतो आणि त्या भूतकाळातील रम्य आठवणींना उजाळा देतो. कोकणातील मातीची कौलारू घर आणि त्या घरा पुढील प्रशस्त अंगण आणि त्या अंगणातील तुळस मनाला प्रसन्न करते.कोकणी माणसांचे प्रमुख दोन सण म्हणजे गणपती आणि होळी या सणाच्या वेळी ही कामानिमित्त बाहेर गावी गेलेली सर्व माणसे ही आपल्या स्वगृही येतात.साऱ्या कुटुंबासह सण मोठ्या उत्साहात साजरा करतात. पारंपारिक नाच गाण्यांचा आनंद घेतात. पारंपारिक चांगल्या प्रथा परंपरा ही माणसं टिकउन ठेवत आहेत.पारंपरिक कोकणी लोकगीत आणि कोळी गीतांनी तर संपूर्ण महाराष्ट्राला वेड लावला आहे.हे माझ्या कोकणातील वास्तव्य काळात प्रत्यक्ष अनुभवता आलं. या पुण्य कोकण भूमीने मला खूप मोठा मित्रपरिवार दिला, जो की तो महाराष्ट्राच्या प्रत्येक भागामध्ये पसरला आहे .एखाद्याच्या बोलीभाषेवरून तो कुठल्या भागातील आहे हे ओळखण्याची क्षमता निर्माण झाली .

आंबा नारळ पोपळीच्या भागातून खळखळत वाहणारे पांढरे शुभ्र झरे हे मन मोहन टाकतात. जंगल भागातून सफर करत असताना मधूनच एखाद्या पांढऱ्या शुभ्र वनगाईचे दर्शन घडतं.यासह विविध प्रकारचे प्राणी पक्षांचे दर्शन मनमोहीत करून टाकते. कोकणी भाषेमध्ये खूप गोडी आहे..

या कोकणभूमी वरती कोसळणाऱ्या बेफाम वाऱ्याने कधीकधी रौद्ररूप धारण करून सर्वच बाबतीत खूप नुकसान झालेल आहे हे मी माझ्या डोळ्यांनी अनेक वेळा पाहिले आहे.खेड शहराला जगबुडी नदीने अनेक वेळा विळखा घातला, वाशिष्टी नदीने चिपळूणला अनेक वेळा पुराच्या पाण्यात उभ केलं. अति पावसाने अनेक वेळा डोंगरकडा कोसळून अनेक गावे त्या दरडीचा शिकार बनतात. वन्य प्राण्यांची धास्ती देखील असते. या सह अनेक नैसर्गिक,मानवनिर्मित संकटांचा सामना करत असताना ही माणसं चिवटपणे आणि संकटांनी नाउमेद न होता जीवन जगत असतात. एखाद्या कंपनीचे प्रदूषण युक्त पाणी समुद्राच्या पात्रामध्ये शिरल्यामुळे अनेक वेळा मासे हे समुद्रामध्येच मरून पडतात,त्यामुळे त्याच्यावर अवलंबून असलेल्या कोळी बांधवांचे अतोनात नुकसान होते.


कोकणामध्ये पर्यटन व्यवसायाने भरारी घेतली आहे.तो व्यवसाय परप्रांतीयांच्या घशात न जाता तो स्थानिक तरुणांच्या उन्नतीचा मार्ग ठरावा. कोकणाचे वेगळेपण जपत व्यवसाय सुधारावा ही अपेक्षा. दुःख तर एकाच गोष्टीच वाटतं की ,एवढा विस्तीर्ण समुद्रकिनारा हा माझ्या कोकणभूमीला लाभला.आत्ता मोठ्या प्रमाणात पर्यटन व्यवसाय हा जोर धरत आहे. पण मूळ कोकणी माणूस या समुद्रकिनाऱ्यालगतची जमीन ही कवडीमोल किमतीमध्ये परप्रांतीयांच्या घशात घालत आहे. आणि नकळत तो आपल्या स्वतःच्या हक्काच्या जमिनीपासून, एखादा व्यवसाय टाकून मालक बनण्यापासून दूर जात आहे. परप्रांतीय लोक ही चिराखाणी विकत घेऊन तेथे आपला व्यवसाय उभारत आहेत. स्थानिक बेघर होत आहेत हे कुठेतरी थांबलं पाहिजे.दिवसरात्र राबराब राबणारा माझा कोंकणी बांधव हा त्या कोकण भूमीचा राजा आहे...त्या राजाचं राजेपण हे पिढ्यान् पिढ्या अबाधीत राहील पाहिजे...ही सदिच्छा....माझ्या कोंकणी माता माउल्याना ,भावंडाना,ज्येष्ठांना, श्रेष्ठांना माझा साष्टांग दंडवत.....

अफाट नैसर्गिक सौंदर्य आणि मनामधे अपार माया घेऊन जगणाऱ्या कोकणी माणसांबद्दल लिहावं तितकं कमीच आहे....तूर्तास इतकेच..... धन्यवाद.....

**शब्दांकन : श्री.मारुती देविदास शिंदे...**
**वागदरी ता. अक्कलकोट जिल्हा सोलापूर**

## दु:खातून बाहेर काढण्यासाठी हसणे ही सर्वात मोठी शक्ती

# जागतिक स्मित हास्य दिवस



**– प्रवीण बागडे, नागपूर**
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

जागतिक हास्य दिनाची स्थापना १९९८ मध्ये करण्यात आली आणि पहिला उत्सव १० मे १९९८ रोजी मुंबई, भारत येथे साजरा करण्यात आला, ज्याची व्यवस्था जगभरातील हास्य योग चळवळीचे संस्थापक डॉ. मदन कटारिया यांनी केली होती. डॉ. कटारिया भारतातील एक फॅमिली डॉक्टर, चेहऱ्याच्या फीडबॅक हायपोथिसिस पासून प्रेरणा घेऊन ते म्हणाले की, चेहऱ्याच्या हालचालींचा माणसाच्या भावनांवर प्रभाव पडतो. चेहऱ्यावरील अभिप्राय गृहीतकाने हशा योग चळवळ सुरू करण्यास प्रेरित झाले होते, ज्यात असे मानले जाते की एखाद्या व्यक्तीच्या चेहऱ्यावरील हावभावांचा त्यांच्या भावनांवर परिणाम होऊ शकतो. जागतिक हास्य दिन साजरा करणे हे जागतिक शांततेसाठी एक सकारात्मक प्रकटीकरण आहे आणि हास्याद्वारे बंधुता आणि मैत्रीची जागतिक जाणीव निर्माण करण्याचा हेतू आहे. हा बहुतेक वेळा हसण्याच्या एकमेव उद्देशाने सार्वजनिक ठिकाणी लोकांच्या मेळाव्याद्वारे साजरा केला जातो. त्याची लोकप्रियता झपाट्याने वाढली आहे. लाफ्टर योग चळवळीसह आता ११५ हून अधिक देशांमध्ये हजारो लाफ्टर क्लबची गणना केली जात आहे आणि आता तो जगभरात साजरा केला जातो.

निरोगी राहण्यासाठी केवळ निरोगी आहार आणि व्यायाम करणे महत्त्वाचे नाही तर तणावमुक्त जीवन जगणे देखील महत्त्वाचे आहे. तणावामुळे अनेक आजारांचा धोका अनेक पटींनी वाढतो आणि त्यामुळेच लोक तणाव कमी करण्यासाठी लाफ्टर थेरपीसारख्या तंत्राची मदत घेतात. लोकांमध्ये एकता आणि सद्भावना वाढवणे तसेच लोकांमध्ये आनंद वाटून घेणे हा दिवस साजरा करण्यामागे उद्देश आहे. एवढेच नाही तर हसण्याने तुमचे आरोग्यही निरोगी राहते. म्हणूनच अनेक लोक सकाळी किंवा संध्याकाळी उद्यानांसारख्या ठिकाणी जमतात आणि जोरात हसतात. तणाव कमी करण्यासाठी हसणे फायदेशीर ठरते, तुमचा मूड चांगला राहतो. तसेच मानसिक आरोग्य देखील निरोगी राहते आणि सकारात्मक उर्जा वाढते. त्यामुळे मित्र, सहकारी आणि कुटुंबातील सदस्यांसोबत हसण्यानेही भावनिक नाते संबंधात सकारात्मकता येते व शरीराची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते. कारण ते तणाव संप्रेरक कमी करून तुमचा कामावरचा फोकस ही वाढतो त्यामुळे आनंदी हार्मोन्स बाहेर पडतात व तुम्हाला फ्रेश वाटते. हसल्याने आयुष्य चार पट वाढतं. प्रत्येकाच्या आयुष्यात अनेक समस्या असतात पण हसल्याने त्या समस्या कमी होण्यास मदत होते. अशा परिस्थितीत हा दिवस अधिक खास बनवण्यासाठी, तुम्ही तुमच्या मित्रांना काही हास्य आणि प्रेमाने भरलेले संदेश पाठवू शकता.

हसणं हे नैसर्गिक ताण कमी करणारं आहे. एक चांगले हसणे एंडोर्फिन सोडते, ती फील-गुड रसायने जी तणाव हार्मोन्सचा सामना करतात. अधिक रिलॅक्स टीम हा एक आनंदी आणि निरोगी टीम असते. टीम बिल्डिंगपासून ते ताणतणाव दूर करण्यापर्यंत आणि चांगल्या समस्या सोडविण्यापर्यंत चांगले हास्य हे चांगली उत्पादकता वाढवू शकते.

हसणं किंवा हास्य शेअर केल्याने नातं आणि मैत्रीची भावना निर्माण होते. यामुळे आपलेपणाची भावना वाढते आणि टीममधील संबंध दृढ होतात. कोणत्याही दुःखातून किंवा दुःखातून बाहेर काढण्यासाठी हसणे आणि आनंद ही सर्वात मोठी शक्ती आहे. हसण्यामुळे तणाव कमी होतो आणि अधिक निवांत वातावरण वाढते. यामुळे विचारांचा मुक्त प्रवाह होऊ शकतो आणि क्रिएटिव्ह विचारांना चालना मिळू शकते. ज्यामुळे समस्या सोडविणे आणि नाविन्यपूर्ण काम होऊ शकते. हसणे कठीण संभाषणादरम्यान तणाव कमी करू शकते आणि लोकांना नवीन कल्पनांसाठी उघडू शकते. हे विश्वास आणि सामंजस्य निर्माण



करण्यात देखील मदत करू शकते. ज्यामुळे स्पष्ट संवाद आणि चांगले सहकार्य होते.

अभ्यासातून असे दिसून आले आहे की हसणे खरोखर उत्पादकता वाढवू शकते. एक निवांत आणि आनंदी टीम त्यांच्या कामात लक्ष केंद्रित आणि व्यस्त असण्याची शक्यता जास्त असते. हसणे हे एक नैसर्गिक रिलॅक्स तंत्र आहे. हे स्नायू सैल करण्यास, रक्तदाब कमी करण्यास आणि तणाव कमी करण्यास मदत करते. एक रिलॅक्स टीम आव्हाने हाताळण्यासाठी आणि दिवसभर एकाग्र राहण्यासाठी अधिक सुसज्ज असते. दिवसाच्या सुरुवातीला आपण हसणे किंवा हास्य शेअर केले तर ते उर्वरित कामाच्या दिवसासाठी सकारात्मक टोन सेट करते. ही सोपी कृती आशावादाची भावना वाढवते आणि आपल्या टीमला अधिक सकारात्मक दृष्टिकोनासह आव्हानांना सामोरे जाण्यास मदत करू शकते. आज बऱ्याच कार्यसंस्कृतींमध्ये सहकार्यांशी जवळीक साधणे आणि त्यांच्याशी जुळवून घेणे हा दिवसाची सुरुवात करण्याचा एक योग्य मार्ग आहे! तसं अजूनही काही ठिकाणी हसण्याचा विसर पडलेला दिसतो. लोक ऑफिसमध्ये धावत येतात आणि कामाला सुरुवात करतात आणि क्वचितच हसण्यासाठी एखादा क्षण शेअर करतात. पण विशेषत: दिवसाच्या सुरुवातीला हसायला विसरणे ही एखादी संधी गमावल्यासारखे आहे, असे मत प्रोफेशनल सर्टिफायड लाइफ कोच आणि नवी दिल्ली येथील कोकोवेव्ह कोचिंग इंटरनॅशनलचे सहसंस्थापक हनी गुध यांनी सुद्धा व्यक्त केले. सर्व हास्य प्रेमींना ऋजागतिक हास्य दिनाऋच्या हार्दिक शुभेच्छा!

# निरवांगी येथील मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शिबिर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



इंदापूर प्रतिनिधी/ अतुल सोनकांबळे : निरवांगी येथील प्राथमिक आरोग्य केंद्र येथे प्रवीण माने यांच्या माध्यमातून राबवण्यात आलेले मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शिबिरास आज सकाळी १० वाजल्यापासून सुरवात झाली. निरवांगी व परिसरातील नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेत मोफत नेत्र तपासणी करून घेतली आहे.

सोनाई परिवाराचे अध्यक्ष दशरथ माने यांच्या हस्ते निरवांगी येथील या शिबिराचे उदघाटन पार पडले. यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना दशरथ माने यांनी आपले सुपुत्र प्रविण माने यांनी संपूर्ण इंदापूर तालुक्यातून मोतीबिंदू आजाराला हद्दपार करण्याचा निर्धार केला असून यासाठी अधिकाधिक नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेण्याचे आव्हान केले. संग्राम माने, अक्षय माने व निलेश माने यांनी निरवांगी येथील या मोफत नेता तपासणी शिबिराचे आयोजन केले होते तर निलेश रंधवे, छगन बनसुडे, अंकुश दोरकर यांनी या कार्यक्रमाचे सर्व नियोजन सांभाळले.

निरवांगी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात सकाळी १० ते ५ या वेळेत १२०९ नागरिकांनी नेत्र तपासणी करून घेतली असून यातील ९७३ नागरिकांना चष्मे वाटप करण्यात आले तर ३५ नागरिकांची पुणे भारती विद्यापीठ येथे शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने सुभाष आण्णा नलवडे सर, नाना पोळ, बबन लावंड सर, राजेश जामदार, दिलीप माने, सुनील खाडे, शरद जाधव, डॉ. विकास शहा, अमोल मुळे, बाळासाहेब गायकवाड, राजू रासकर, संतोष पोळ, बबन शेख, नामदेव रेडेकर, संजय डोनाल्ड शिंदे, नारायण शिंदे, समदभाई सय्यद, किसनराव पिंगळे, भरत जाधव, निवृत्ती पेडकर, राजू जाधव, अशोक पोळ, डॉ. शरद शिर्के, डॉ. तमन्ना मॅडम, डॉ. संतोष रणवरे, सुहास माने व आशा स्वयंसेविका यावेळी उपस्थित होत्या.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### सोने चोरल्याच्या कारणावरून काठीने मारहाण ; तिघांवर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) सोने चोरल्याच्या कारणावरून काठीने तरुणास मारहाण केल्याप्रकरणी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना ३ ऑक्टोंबर रोजी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास पाटील वाडा हॉटेल दहिटणे येथे घडली. याप्रकरणी शेखर श्रीमंत शेटे (वय-२१,रा.दहिटणे मित्र नगर, शेळगी) याने जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्याच्या फिर्यादीवरून गुरुशांत बंकलगी व त्याचे दोन मित्र (रा.दहिटणे मित्र नगर,शेळगी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेची थोडक्यात हकीकत अशी की,गुरुशांत बंकलगी हा फिर्यादी शेखर शेटे याचा भाडेकरी आहे. त्यावेळी फिर्यादी शेखर हा घरात झोपलेला असताना गुरुशांत याने फोन करून फिर्यादीस वरील ठिकाणी ये म्हणून सांगितले असता,त्यावेळी फिर्यादी तेथे गेला असता वरील संशयित आरोपी यांनी फिर्यादीस तू आमच्या घरातील सोने चोरलास ते आणून दे.या कारणावरून लाकडी काठीने डाव्या हातावर,डोक्यावर,पाटीवर मारून शिवीगाळ करत जखमी केले आहे.असे फिर्यादीत नमूद आहे.पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल वाघमारे हे करीत आहेत.

### पोलिसात दिलेली फिर्याद मागे घेण्यावरून मारहाण

सोलापूर (प्रतिनिधी) पोलिसात दिलेली फिर्याद मागे घे असे म्हणून शिवीगाळ करून हाताने मारहाण केल्याप्रकरणी एका जनाविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना २१ सप्टेंबर रोजी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास के एस ऍस्टर बिल्डिंग भवानी पेठ येथे घडली.याप्रकरणी प्रशांत जगन्नाथ सिंदगी (वय-४६,रा.के एस ऍस्टर बिल्डिंग,भवानी पेठ) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून सोमनाथ परमेश्वर चारे (रा.शेळगी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी घरी असताना वरील संशयित आरोपी याने त्यांच्याविरुद्ध मागील फिर्यादीचा राग मनात धरून फिर्यादीच्या घरात घुसून माझ्याविरुद्ध पोलिसात दिलेली फिर्याद मागे घे असे म्हणून शिवीगाळ करत हाताने मारहाण केली.असे फिर्यादीत म्हटले आहे.पुढील तपास पोसई.बामणे हे करीत आहेत.

# शरद पवारांचा भाजपला मोठा धक्का, हर्षवर्धन पाटील पवारांच्या गळाला लागले,... तुतारी फुंकणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : पश्चिम महाराष्ट्रात शरद पवारांनी भाजपला आणखी एक मोठा धक्का दिला आहे. माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी तुतारी फुंकण्याचा निर्णय जाहीर केला आहे.

शरद पवारांसोबत आमचे अनेक दशकांपासूनचे कौटुंबिक संबंध आहेत. त्यांनीच मला पक्षात येण्याचा आग्रह धरला. त्यानंतर मी कार्यकर्त्यांसोबत चर्चा केली. त्यांनी शरद पवारांच्या पक्षात जा, अशी भूमिका घेतली. त्यानंतर मी पक्षांतराचा निर्णय घेतला, असं पाटील म्हणाले.






माझ्या पक्षप्रवेशाची तारीख आता शरद पवार ठरवतील, असं पाटील यांनी सांगितलं. पाटील यांच्या पक्षांतरामुळे अजित पवार गटाच्याही अडचणी वाढणार आहेत. पाटील यांना इंदापूरातून विधानसभेची उमेदवारी निश्चित मानली जात आहे. त्यामुळे ते अजित पवारांचे आमदार दत्ता भरणे यांना विधानसभेला पुन्हा एकदा आव्हान देतील.

हर्षवर्धन पाटील यांनी पक्षांतराचा निर्णय घेण्यामागील कारणांची कार्यकर्त्यांसमोर थोडक्यात उजळणी केली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत झालेली बैठक, त्यानंतर शरद पवारांची झालेली भेट, या दोन्ही नेत्यांसोबत झालेल्या चर्चेतील तपशील पाटील यांनी सांगितला. 'गेल्या २ महिन्यांपासून मी इंदापुरात फिरतोय. लोकांशी बोलतोय. तुम्ही विधानसभा लढायला हवी, अशी कार्यकर्त्यांची भावना आहे. त्यांची भावना मी भाजपमधील नेत्यांपर्यंत पोहोचवली,' असं पाटील म्हणाले.

# अक्कलकोट तालुका आकांक्षीत तालुका कार्यक्रम संपूर्णतः अभियान समारोप कार्यक्रम संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट, (प्रतिनीधी) : निती आयोग भारत सरकार यांच्या मार्गदर्शनानुसार आकांक्षीत तालुका अक्कलकोट अंतर्गत दिनांक ०१.०७ २०२४ ते ३०.०९.२०२४ २०२४ या कालावधीत संपूर्णता अभियान कार्यक्रम राबविण्यात आला या कार्यक्रमाचा समारोप दिनांक चार ऑक्टोबर रोजी मल्लिकार्जुन मंगल कार्यालय अक्कलकोट येथे कुमार आशीर्वाद जिल्हाधिकारी सोलापूर व कुलदीप जंगम मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सोलापूर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम घेऊन समारोप करण्यात आले.

नीती आयोगामार्फत सुरू असणाऱ्या आकांक्षीत तालुका या योजनेत एकूण ४० इंडिकेटर वरती काम चालू आहे मात्र त्यापैकी सहा इंडिकेटरचे काम पूर्णत्वास नेण्यासाठी अभियान सुरू करण्यात आलेले होते या अभियानांतर्गत तालुक्यातील गरोदर महिला नोंदणी, रक्तदाब तपासणी, मधुमेह तपासणी, गरोदर महिलांना सकस आहार देणे विशेष जागृती, महिला बचत गटांना खेळते भांडवल उपलब्ध करून देणे आणि कृषी विभाग अंतर्गत जास्तीत जास्त शेतकऱ्याचे हेल्थ कार्ड तयार करणे प्रमुख उद्दिष्ट होते. या कार्यक्रमासाठी अक्कलकोट तालुक्यातील सरपंच व सर्व विस्तार अधिकारी, अंगणवाडी पर्यवेक्षिका, ग्रामपंचायत अधिकारी ,तलाठी कृषी सहाय्यक, अंगणवाडी सेविका, अशा सेविका यांची उपस्थिती होती या कार्यक्रम अंतर्गत तालुकास्तरीय अधिकारी व उत्कृष्ट काम करणारे कर्मचारी यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले यावेळी प्रमुख मान्यवर यांनी मनोगत व्यक्त करून यापुढेही आकांक्षीत तालुका योजनेतील उर्वरित ३४ सिंडिकेटरवर काम करणे बद्दल प्रोत्साहित केले.

सदर कार्यक्रमास तहसीलदार श्री विनायक मगर, गटविकास अधिकारी शंकर कवितके, दक्षिण पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक श्री महेश स्वामी, तालुका कृषी अधिकारी हर्षद निगडे, नगरपालिकेचे मुख्याधिकारी रमाकांत डाके, प्रकल्प अधिकारी विशाल भोसले, तालुका आरोग्य अधिकारी डॉ अश्विन करजखेडे, उपअभियंता राठोड, पशुधन विकास अधिकारी डॉ दिनेश मुरूमकर, कनिष्ठ प्रशासन अधिकारी दयानंद परिचारक, आकांक्षीत तालुका फेलो प्रीती रोकडे, यंग फेलो निकिता गायकवाड, विस्ताराधिकारी भोरे पठाण, कोळी, अभय निलुरे, पोतदार, मठ, निकम, बोरगाव, वाघमोडे, राठोड, कोरे, जमादार, कोरे, दामटे, अंजूटगी, कनाळ, ग्राम तालुकास्तरीय अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते सूत्रसंचालन विस्तार अधिकारी संजय पाटील यांनी केले आभार बाल विकास प्रकल्प अधिकारी श्री विशाल भोसले यांनी मानले.



# लोकसहभाग अंतर्गत शाळेतील मुलांना खाऊ वाटप, व शाळेचा सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घोळसगांव : घोळसगाव येथील जिल्हा परिषद मराठी शाळेमध्ये लोकसहभागातून शाळेचा विकास या उपक्रमांतर्गत जगदंबा प्रतिष्ठान यांच्यावतीने खाऊ वाटप करण्यात आले तसेच शाळेला तालुकास्तरीय शाळा पुरस्कार मिळाल्याबद्दल शाळेतील सर्व शिक्षक व मुख्याध्यापकांचे जगदंब प्रतिष्ठान यांच्यावतीने शाल , हार, पुष्पगुच्छ आणि मानाचे फेटे बांधून सत्कार करण्यात आला. तसेच शाळेला सतत मदत करणारे उमेश अप्पा साळुंखे यांना वाढदिवसानिमित्त शाळेच्या वतीने सत्कार करून शुभेच्छा देण्यात आले कन्नड शाळेचे शिक्षक नागराज पाटील यांना जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सत्कार जगदंब प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले नवनियुक्त तंटामुक्त अध्यक्ष संजय होळे व शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रामेश्वर पाटील यांचे सत्कार प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष तंटा मुक्त अध्यक्ष संजय होळे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष रामेश्वर पाटील, सदस्य मल्लिनाथ हडपद, ग्रामपंचायत सदस्य बालाजी कांबळे, जगदंबा प्रतिष्ठानचे अध्यक्ष उमेश साळुंखे , शशिकांत साळुंखे, विजय कुमार पाटील, प्रतिष्ठानचे सर्व सदस्य तसेच शाळेतील शिक्षक अमोल गुंजोटे रामेश्वर दरेकर सर वागदरकर सर उपस्थित होते. कार्यक्रम सूत्रसंचालन अजित ठाकर सर यांनी केले याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक सोमनाथ मोरे यांनी प्रतिष्ठानचे आभार व्यक्त केले

# इंदापूर महाविद्यालयात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ केंद्राच्या विभागीय क्रिडा स्पर्धा उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/ अतुल सोनकांबळे : कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, इंदापूर येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्राच्या वतीने इंदापूर महाविद्यालयाच्या प्रांगणात विभागीय क्रिडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विभागीय क्रिडा महोत्सवाचे उद्घाटन युवा नेते व संस्थेचे संचालक राजवर्धन पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

या स्पर्धेत एकूण १३ क्रीडा प्रकारांचा समावेश होता. गोळा फेक, भालाफेक, थाळीफेक, लांब उडी,उंच उडी, तिहेरी उडी, हॉलीबॉल, बास्केटबॉल,कबड्डी, खो-खो, धावणे, रिले, चेस इत्यादी तसेच प्राविण्य प्राप्त केलेल्या खेळाडूंना प्रमाणपत्र व केंद्रीय क्रीडा महोत्सवाची निवड पत्र लगेच देण्यात आली. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ८५ विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा स्पर्धेत सहभाग नोंदविला.

राजवर्धन पाटील आनंद व्यक्त करीत म्हणाले की,' महाविद्यालयातील सर्व खेळाडूंना प्रोत्साहन देण्याचे काम आमच्याकडुन केले जाईल तसेच अशा प्रकारच्या क्रिडा स्पर्धेचे जास्तीत जास्त प्रमाणात आयोजन होणे गरजेचे आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जीवन सरवदे , उपप्राचार्य प्रा.दत्तात्रय गोळे,नाशिक येथुन उपस्थित राहीलेले रसायनशास्त्र अधिष्ठाता प्रा .भारत मोरे.पुणे विभागीय कार्यालयाचे कार्यालयाचे क्रीडा समन्वयक , संतोष कडबाने, तानाजी लंगोटे, व डॉ. शिवाजी वीर, डॉ.भिमाजी भोर, डॉ. सदाशिव उंबरदंड, डॉ. राजेंद्र भोसले यावेळी उपस्थित होते.

इंदापूर अभ्यास केंद्राचे केंद्र संयोजक प्रा. युवराज फाळके यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. या क्रीडा स्पर्धेचे निरीक्षक म्हणून प्रा गाडेकर यांनी काम पाहिले . या क्रीडा स्पर्धासाठी पंच म्हणून सुनील जाधव, बागल एच.डी, गलांडे.टी.पी, नरुटे टी.बी., घोगरे.बी.बी, घाडगे.एस.टी , अण्णासाहेब खटके सर, रामदास देवकर, डी. एस.वाबळे, ए.आर.बनकर यांनी कार्य केले. क्रीडाशिक्षक बापू घोगरे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाचे आभार डॉ.राजेंद्र भोसले यांनी मानले. प्रा.निशांत पवार, प्रा.दर्शन दळवी,प्रा. राजीव शिरसट, डॉ.रामचंद्र शेलार, प्रा.कल्याणी देवकर तसेच दादा कांबळे, सुरेश शिंदे यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.





# दुर्गम आदिवासी भागातील शालेय विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तु व अन्नदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नाशिक /प्रतिनीधी : नवरात्रीच्या पूर्वसंध्येला नमस्ते नाशिक फाउंडेशन यांच्याकडून दुर्गम आदिवासी भागातील शालेय विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तु व अन्नदान करण्यात आले.

जिथे कमी तिथे आम्ही या उक्तीवर चालणाऱ्या नमस्ते नाशिक फाउंडेशन नाशिक यांच्याकडून अशा भागात जिथे आर्थिक परिस्थिती नसल्यामुळे अनेक विद्यार्थी दैनंदिन गरजेच्या वस्तुंपासून वंचित राहतात तिथे संस्थेच्या अध्यक्षा स्नेहल देव यांच्या संकल्पनेतून संस्थेच्या वतीने शालोपयोगी वस्तु जसे वही, खोड रबर, पेन्सिल, पाट्या, टॉवेल, मुलींसाठी सॅनिटरी पॅड, शाळेतील विज्ञान शाखेच्या हॉलमध्ये थंड हवेसाठी हवेचा पंखा, शाळेच्या पटांगणात सावली मिळावी याकरिता व्यावसायिक छत्री, मुलांना शुद्ध पाणी मिळावे याकरिता वॉटर फिल्टर व सर्व विद्यार्थ्यांना अन्नदान रुपी मिठाई व शरीरास पोषक असे ड्रायफूट चे वाटप करण्यात आले. शाळेतील ज्या विद्यार्थ्यांनी उत्तुंग यश मिळवले आहे त्या विद्यार्थ्यांचा पेन सेट देऊन संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला, ठाणगाव तालुका सिन्नर येथील विविध शाळेंमध्ये उपक्रम राबविण्यात आला, कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेच्या स्नेहल देव, अपर्णा बापटे, अश्विनी पाटील, संदीप देव उपस्थित होते कार्यक्रमास, प्रसिद्ध उद्योजक हरीश गुरुनानी यांचे मार्गदर्शन लाभले, महावीर इंटरनॅशनल चे अनिल नहार, कर्नल मच्छिंद्र शिरसाट,यांचे मोलाचे सहकार्य लाभले, शाळेच्या वतीने सहाय्यक शिक्षक संजय भांगे, बापू गोविंद, श्रीमती सुवर्णा शिरसाट, श्रीमती ज्योती शिरसाट, मुख्याध्यापक राजाराम आहेर, यांनी आभार मानले.

## कार्यकर्त्यांनी कामाला लागुन महायुतीचे सरकार आणावे

## सातारा येथे रिपाइंच्या ६७ व्या वर्धापन दिनानिमित्त मेळावा

# कोणी संविधान बदलणार असेल तर याद राखा कोथळा काढू : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सातारा/ मुंबई : रिपब्लिकन पक्ष छोटा पक्ष असला तरी मोठ्या पक्षांना सत्ता मिळवून देण्यात मोठी मदत करणारा पक्ष आहे. या पक्षाला वाढवायचे आहे.

आताच्या विधानसभा निवडणुकीतही मिळतील त्या जागांवर लढणार आहोत. त्यामुळे कार्यकर्त्यांनी कामाला लागुन महायुतीचे सरकार आणावे, असे आवाहन रिपब्लिकन पक्षाचे राष्टीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी केले. त्याचबराबर देशाचे संविधान कोणीही बदलू शकत नाही मात्र बदल आणि आरक्षण हटविण्याचा कोण विचार करणार असेल तर याद राखा, उद्या मरायचे ते आज मरु. वाघ नखे मला मिळाली तर संविधान बदलण्याचा विचार करणाऱ्यांचा कोथळा काढू असा इशाराही ना. रामदास आठवले यांनी दिला.

सातारा येथे तालीम संघ मैदानावर रिपाइंच्या ६७ व्या वर्धापन दिनानिमीत्त आयोजित मेळाव्यात ना. रामदास आठवले बोलत होते. यावेळी माजी मंत्री अविनाश महातेकर, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे, सीमाताई आठवले, जीत आठवले, गौतम सोनवणे; सिद्धार्थ कासारे; चंद्रकांता सोनकांबळे; शिलाताई गांगुर्डे, मेळाव्याचे संयोजक अशोक गायकवाड, सुर्यकांत वाघमारे, स्वप्निल गायकवाड, अण्णा वायदंडे रमेश मकासरे, विजय वाकचौरे, सुरेश बार्शिंग, श्रीकांत भालेराव,बाळाराम गायकवाड, प्रकाश लोंढे, विजय आगलावे, दयाळ बहादुर,अनिल गांगुर्डे, यांच्यासह राज्यातील रिपाइं पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी रिपब्लीकन पक्षाच्या पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष पदी अशोक गायकवाड यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली.

केंद्रीय राज्यमंत्री ना. रामदास आठवले म्हणाले की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणखी काही वर्षे असते तर रिपाइं पक्ष मोठा झाला असता. देशाच्या राजकारणालाही वेगळी कलाटणी मिळाली असती. आता आपल्याला पक्ष वाढवायचा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या उद्देशाप्रमाणे आपण सत्तेपर्यंत पोहोचलोय. यापुढे संपूर्ण देशात पक्ष घेऊन जाण्याचे मिशन आहे.

कॉग्रेसचे राहुल गांधी यांनी संविधान बदलणार म्हणून चर्चा घडवुन आणली. पण संविधान बदलता येणार नाही. तरीही कोणी आमच्या पायावर पाय देत असेल तर आम्ही काय करायचे ते ठरवू, पण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आम्हाला पेटवायला नाही तर विझवायला शिकवले आहे. आम्ही हिंसा नाही अहिंसा मानतो. पेटविण्या पेक्षा पटविणे महत्वाचे असून आमची भूमिका आम्ही पटवून देण्याचे काम करीत आहोत असेही केंद्रीय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी यावेळी स्पष्ट केले.

प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांनी पक्षाने भाजपकडे विधानसभेच्या १८ ते २० जागांची मागणी केली आहे. निवडणुक लढवुन विधानसभेत पक्षाच्या कार्यकर्त्याला पाठवुया असे आवाहन ना. रामदास आठवले यांनी केले. अशोक गायकवाड म्हणाले की, ना.





रामदास आठवले भाजपबरोबर सत्तेत गेले नसते तर विकास झाला नसता. थे जातीयवाद्यांबरोबर नाही तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराबरोबर गेले आहेत. त्यांच्यामुळेच पक्ष जिवंत आहे.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## थोडक्यात

### अज्ञात कारणाने प्रभारी मुख्याध्यापकाची नदीत उडी मारून आत्महत्या



अक्कलकोट/ प्रतिनिधी : हन्नुर ता. अक्कलकोट येथे सोमवारी ४ ऑक्टोबर रोजी सव्वानऊ वा. पुर्वी ५४ वर्षीय इसमाचा हन्नुर गावाजवळील हरणा नदीच्या पुलावरुन अज्ञात कारणाने पाण्यात उडी मारून मयत झाला. राजकुमार तिपण्णा पारतनाले (वय ५४ वर्षे) रा. हन्नुर ता. अक्कलकोट असे मयताचे नांव आहे. अक्कलकोट उत्तर पोलीस स्टेशन मध्ये मयताची नोंद झाली आहे. खबर शांतप्पा तिपण्णा पारतनाळे (वय ३८ वर्षे) व्यवसाय नोकरी रा. हन्नुर यांनी दिली. याबाबत पोलीस सुत्राकडुन मिळालेली अधिक माहिती अशी की, सोमवारी सव्वानऊ वा. उपचारापुर्वी राजकुमार तिपण्णा पारतनाळे (वय ५४) वर्ष हा हन्नुर ता. अक्कलकोट यांनी कोणत्यातरी अज्ञात कारणाने हन्नुर गावाजवळील हरणा नदीच्या पुलावरुन पाण्यात उडी मारल्याने त्यास बाहेर काढून त्यास ग्रामीण रुणालय अक्कलकोट येथे उपचाराकरिता घेऊन गेले असता तेथील डॉक्टरांनी त्यांना तपासून तो उपचारापुर्वीच मयत झाल्याचे सांगितले. अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे येथे अकस्मात मयत रजिस्टरी नोंद केली. मयत हे नन्हेगांव येथे जि प शाळेत प्रभारी मुख्याध्यापक म्हणून कार्यरत होते. त्यांच्या पश्चात पत्नी, भाऊ व वहिनी असा परिवार आहे. अधिक तपास पोहेकॉ कलशेट्टी हे करीत आहेत.

### सरकारी कामात अडथळा ; ११ जणांवर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी ११ जणांविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना १ आक्टोंबर रोजी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास कमल नगर हैदराबाद रोड येथे घडली.ॲड.मीरा कैलास प्रसाद (वय-४४-,रा.निर्माण गॅलेक्सी अपार्टमेंट,महालक्ष्मी नगर,नवीन आरटीओ रोड,सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सिकंदर अब्दुलगणी सय्यद,निशाद सिगंदर सय्यद,अब्रार शकील शेख,मुमताज शकील शेख,तनवी अब्रार शेख,तब्रिज इलियास शेख,शकील ऐहम इब्राहिम शेख,साबिया इलियास शेख,यास्मिन बुकवाले,अंजुम सय्यद जहांगीर सय्यद व जहांगीर सय्यद (सर्व.रा.कमल नगर,हैदराबाद रोड) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

# सोलापुरात दरोड्याच्या तयारीतील दोघे जेरबंद ; चारजण फरार

## विजापूर नाका पोलिसांची कामगिरी ; संशयितांना पाच दिवस पोलिस कोठडी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (प्रतिनिधी) हत्तुरे वस्ती ते पत्रकार भवन या मार्गावर दरोडा टाकण्याच्या तयारी असलेल्या दोघांना विजापूर नाका पोलिसांनी जेरबंद केले आहे.पोलिस पाठलाग करत असताना चारचाकीतील सहापैकी चौघेजण संधी साधून फरार झाले आहेत.विशाल कृष्णप्पा बंडीवडार व अनिल शिवप्पा वड्डर (दोघेही रा.हनगल,हावेरी कर्नाटक) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.

नवरात्र महोत्सवामुळे विजापूर नाका पोलिसांचे वाहन गुरुवारी दुपारी साडेबारा ते एकच्या दरम्यान विजयपूर रोडवरून गस्त घालत होते.त्यावेळी एमएच १२ पासिंग असलेल्या चारचाकीतील व्यक्तींबद्दल पोलिसांना संशय आला. पोलिसांनी पुढे नेलेले वाहन सात रस्त्याच्या दिशेने वळविले आणि त्या चारचाकीतील संशयितांनी वाहनाचा वेग वाढविला.वेगवेगळ्या भागातून संशयितांनी त्यांचे वाहन महावीर चौकामार्गे पत्रकार भवन चौकाच्या दिशेने वळविले. पण,त्यांचा पाठलाग करताना पोलिसांनी त्या चौकात एक डंपर रस्ता दुभाजकाजवळ आडवा लावला होता. संशयितांना आपली गाडी तेथून जाईल,असे वाटले पण त्यांचा अंदाज हुकला. त्यांच्या गाडीची धडक दुभाजकाला व डंपरला बसली.

पोलिस मागून येत असल्याने मागे बसलेले चौघे उतरून कंबर तलावाच्या दिशेने पळून गेले.एकाचा पाठलाग करून तर एकाला वाहनातच पोलिसांनी पकडले.संशयित चोरट्यांच्या वाहनाची तपासणी केल्यावर पोलिसांना त्यात लहान-मोठे तीन कटर,कुऱ्हाडी,एक्साब्लेड,स्क्रू ड्रायव्हर, इलेक्ट्रिक कटर मशिन,लोखंडी हातोडा,सहा कापडी मास्क आढळले. चारचाकीसह (एमएच.१२, टीडी २२३८) दरोड्यासाठी आणलेले साहित्य पोलिसांनी जप्त केले आहे. अटक केलेल्या दोघांना शुक्रवारी न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्यांना पाच दिवसांची (८ ऑक्टोबरपर्यंत) पोलिस कोठडी ठोठावली आहे. सहायक पोलिस निरीक्षक शीतलकुमार गायकवाड तपास करीत आहेत.

### दोघेही रेकॉर्डवरील गुन्हेगार

**कर्नाटकातील विशाल बंडीवडार,अनिल वड्डर, प्रशांत ऊर्फ परश्या, कृष्णा ऊर्फ कृष्णप्पा बंडीवडार, प्रवीण व अनंत (चौघेही रा. चिनहळ्ळी, कर्नाटक) हे सर्वजण दोन दिवसांपूर्वीच सोलापूर शहरात दरोडा टाकण्याच्या उद्देशाने गावातून निघाले होते. विजापूर नाका पोलिसांनी त्याचा प्लॅन हाणून पाडला असून हत्तुरे वस्तीजवळ संशयितरित्या दोघे फिरत होते. पोलिसांनी त्यांच्याकडे पहाताच त्यांनी तेथून पळ काढत त्यांनी आणलेल्या चारचाकी वाहनाकडे धाव घेतली. पोलिस पाठलाग करत असल्याचे जाणवताच त्यांनी आपले वाहन वेगवेगळ्या मार्गाने नेले. पण, पोलिसांनी त्यांचा पाठलाग करून सहापैकी दोघांना अटक केली. विशाल व अनिल हे दोघेही पोलिसांच्या रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असून त्यांच्यावर कर्नाटक व इचलकरंजी पोलिस ठाण्यात दरोडा, जबरी चोरीचे गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. उर्वरित संशयितांचा शोध सुरु आहे.**

## नवरात्र महोत्सव : श्री विठ्ठलास अलंकार, रूक्मिणी मातेस पारंपारिक कमलादेवी पोषाखासह अलंकार परिधान



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/पंढरपूर : घटस्थापनेपासून नवरात्र महोत्सवास सुरवात होत आहे. या निमित्त दुपारी दरवर्षी प्रथा परंपरेप्रमाणे तिस-या दिवशी श्री विठ्ठल व माता रुक्मिणीला पारंपारिक पोषाखासह अलंकार परिधान करण्यात आले आहेत. त्यामध्ये रूक्मिणी मातेस कमलादेवी पोषाख परिधान करण्यात आला असल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

श्री विठ्ठलास सोन्याचा मुकुट, हिऱ्याचा नाम, कौस्तुभ मणी, दंडपेट्या, हिऱ्याचा कंगन, मोत्याचा तुरा, मोत्याची कंटी, इमिटेशन नेकलेस, शिरपेच तुरा, मत्सजोड, तोडे, सोन्याचा करदोडा, बोरमाळ, मोहन माळ तसेच रुक्मीणी मातेस सोन्याचा मुकुट, नवरत्नाचा हार, चिंचपेटी, मद्रासी कंठा, दशावतारी-हार, सोन्या मोत्याचे ताणवड, मोत्याचा कंठा, सूर्य, बाजीराव गरसोळी, पेठेची बिंदी, मन्या मोत्याचा पाटल्या, सोन्याचे बाजूबंद, मत्स्य जोड, रुळजोड, पैंजण, नथ, कर्णफुले, कंबरपट्टा तसेच राधिका मातेस नक्षी टोप, जवमनीपदक, पुतळ्यांची माळ, जवेचे माळा, लक्ष्मी हार व सत्यभामादेवीला सिद्धेश्वर टोप, लक्ष्मी टोप, हायकोल, चिंचपेटी तांबडी, मोरांची माळ, जवेची माळ इत्यादी प्रकारचे अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

तसेच मंदिर समितीच्या अख्त्यातरीत असलेल्या पंढरपूर शहर व परिसरातील लखुबाई, अंबाबाई, पद्मावती, यल्लमादेवी, यमाई-तुकाई माता आदी परिवार देवतांना देखील पारंपारिक पोषाख करण्यात आला आहे. श्रीस परिधान करण्यात येणारे अलंकार अत्युत्कृष्ट व असामान्य कलाकुसरीचे तसेच पुरातन व दुर्मिळ आहेत. या अलंकाराचे 'मकर कुंडले तळपती श्रवणी। कंठी कौस्तुभमणी विराजित।' यांसारख्या अनेक अभंगांतून संतांनी वर्णन केलेले आहे. नवरात्र महोत्सवानिमित्त श्री विठ्ठलास नऊ दिवस दुपारी पोषाखावेळी अलंकार व रूक्मिणीमातेस विविध प्रकारचे पारंपारिक पोषाखासह अलंकार परिधान करण्यात येत असल्याने, भाविकांची मोठी गर्दी होत आहे. नवरात्र उत्सवातील सर्व प्रथा व परंपरांचे कटाक्षपणे पालन करण्यात येत असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगीतले.

# तहसिल कार्यालय शहराबाहेर हलविण्याच्या प्रक्रियेला वंचित बहुजन आघाडीचा विरोध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

करमाळा/ प्रतिनिधी : आज करमाळा या ठिकाणी वंचित बहुजन आघाडी करमाळा शहर व ग्रामीण भागाच्या वतीने तहसील कार्यालय शहराबाहेर हलविण्याच्या प्रक्रियेला विरोध म्हणून मौलाली माळ याठिकाणी निषेध आंदोलन करण्यात आले जर प्रशासकीय कार्यालये शहराबाहेर गेले तर ते सर्व सामान्य नागरिकांना बराच त्रास सहन करावा लागणार आहे.

आजची परिस्थिती पाहिली तर ब्रिटिश कालीन तहसील कार्यालय सुस्थितीत आहे तरीही नवीन तहसील कार्यालय शहराबाहेर हलविण्याचा घाट घातला आहे म्हणून आज वंचित बहुजन आघाडीच्या वतीने आंदोलन करण्यात आले,

यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष सुभाष ओव्हळ तालुका उपाध्यक्ष अजय पवळ शहराध्यक्ष विशाल लोंढे शहर उपाध्यक्ष यशवंत कांबळे उपाध्यक्ष जितेश रणबागुल ता संघटक विनोद धेंडे युवा तालुका युवा जिल्हा उपाध्यक्ष आनंद पवळ उपाध्यक्ष संभाजी कांबळे महेंद्र जगदाळे प्रविण कांबळे शुभम देडगे संतोष पवळ शैलेश कांबळे भैय्या पवार बंटी कांबळे युवा नेते निलेश कांबळे सचिन घोडके मदारी समाजाचे अध्यक्ष उम्मर मदारी विलास ओव्हळ अशोक ओव्हळ मधुकर लावंड आदी कार्यकर्ते उपस्थित होते




# नगरपरिषद आरोग्य विभागाचे मुकादम बालाजी पारखे यांचा सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने अक्कलकोट नगरपरिषद आरोग्य विभागाचे मुकादम बालाजी उर्फ गोविंद पारखे यांच्या वाढदिवसानिमित्त सत्कार करण्यात आला.

यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष कमलाकर सोनकांबळे, सचिव विश्वनाथ चव्हाण, काँग्रेस पक्षाचे माजी शहराध्यक्ष बसवराज अळ्ळोळी, कंटेहळ्ळीचे सरपंच अनिल येडे, फकीरादलाचे जिल्हाप्रमुख ज्योतिबा पारखे, अमित बनसोडे, मुकेश बनसोडे, उपसरपंच चंद्रकांत वग्गे, पिरप्पा बिराजदार आदी उपस्थित होते.

# अंबिका योगाश्रमच्या वतीने आजपासून मोफत त्रैमासिक योग वर्ग सुरु

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वैराग/प्रतिनीधी : अंबिका योगाश्रम ठाणे अंतर्गत वैराग शाखेच्या वतीने रविवार ता .६ आक्टोंबर पासून मोफत त्रैमासिक योग प्रशिक्षण वर्ग सुरू होणार आहे . याचा वैराग व परिसरातील नागरिकांनी जास्तीत जास्त फायदा घ्यावा असे आवाहन वैराग शाखेचे प्रमुख योग शिक्षक दत्तात्रय उंडाळे यांनी केले आहे.

योग या शब्दाचा अर्थ एकमेकांशी जोडले जाणे. शरीर व मन जोडल्या गेल्याने आपल्या शारीरिक, मानसिक, भावनिक, बौद्धिक, आध्यात्मिक व सामाजिक घटकांना स्वत:शी जोडणे किंवा स्वयं अनुभवातून जोडणे म्हणजे योग होय. व्यक्तिमत्त्वाचा विकास होऊन सर्वांगीण प्रगती करता येते.त्यामुळे जीवनात योगाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

अंबिका योगाश्रम ठाणे अंतर्गत वैराग शाखेच्या वतीने येथे नामदेव मंदीरात गेली पाच वर्षापासून विनामूल्य योग वर्ग चालतात . आतापर्यंत सुमारे तीन हजार साधकांनी याचा लाभ घेतलेला आहे . संस्थेकडे ६५ योगशिक्षक आहेत .

महिलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र महिला योग शिक्षिका आहेत . तर पुरुषांसाठी देखील स्वतंत्र प्रशिक्षणचि व्यवस्था आहे .साधकांच्या आजारानुसार येथे वेगवेगळ्या पद्धतीने तसेच वयोमानानुसार विनामूल्य योग शिकवला जातो .वैराग शहर व परिसरातील विविध शाळेवरती जावून विद्यार्थ्यांना योगाचे धडे देखिल येथिल योग शिक्षक देत आहेत .

विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यताप्राप्त मुक्त प्रशिक्षण वर्गा प्रमाणे योग प्रशिक्षण घेणाऱ्या व्यक्तिंना कोर्स पूर्ण झाल्यानंतर प्रमाणपत्र देण्यात येते .



सज्जन चवरे , घाणेगाव : माझे (वय ४६) असून २७ मे २०२२ रोजी नाशीक येथिल एस एम हॉस्पीटल मध्ये मनक्याचे ऑपरेशन करण्याचे ठरले होते . पाय बधीर होत असल्याने चालता येत नव्हते . चालताना पिंड्या , मांडी यांना खूप त्रास व्हायचा . तिन महिने योग प्रशिक्षण घेतले . आजारावर खुप चांगला फरक पडला आणि आळदी ते पंढरपुर दोन वाऱ्या पुर्ण करू शकलो . सध्या ९० टके त्रास कमी झाला आहे.

डॉ. साई रुद्रवरम , वैराग ( बी ए एम एस व्दितीय वर्ष ): डॉ. साई रुद्रवरम हे मुळ रा. पिंपळगाव ता . हदगाव जिल्हा नांदेड येथिल असून ते सध्या वैराग येथिल साई आर्युवेद महाविद्यालयात दुसऱ्या वर्षातील शिक्षण घेत आहेत . दरम्यान १२ वी नंतर नीट परिक्षेची तयारी करताना अभ्यासाचा ताण व वैदयकिय शिक्षणासाठी प्रवेश मिळाल्यावर अभ्यासाचा ताण येऊन मनामध्ये न्यूनगंड तयार झाला होता की आपणाला पुढे शिक्षण जमणार नाही . अभ्यास सोडून गावी जावू . मात्र अंबिका योगाश्रमाच्या माध्यमातून योगाचे प्रशिक्षण पुर्ण केले .त्यामुळे आता आत्मविश्वास वाढला .मानसिक दबाव कमी झाला . परीस्थितीला सामोरे जाण्याचे धाडस वाढले . मनाला फ्रेश वाटत आहे . माझ्यात ९० टक्के बदल झालाय.

## स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसी मध्ये 'राष्ट्रीय फार्मासिस्ट सप्ताह' उत्साहात साजरा

## व्यवस्थापकीय संचालक डॉ. नागेंद्र कोंडेकर

# कंफर्ट झोन सोडून काम केल्याशिवाय यश अशक्य






**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : 'फार्मासिस्ट हे केवळ औषधांमध्येच तज्ञ नसतात तर ते आरोग्य सेवा प्रणालीचे महत्त्वाचे आधारस्तंभ असतात. त्यांचे काम केवळ औषधे देणे हे नसून रुग्णांना त्यांच्या आरोग्याबाबत जागृत राहून त्यांचे आरोग्य कसे उत्तम राहील यासाठी मार्गदर्शन करणे हे होय.

यासाठी वेळोवेळी योग्य माहिती देवून त्यांना उर्जित करणे, औषधांच्या योग्य वापराबाबत जागरूक करणे, आरोग्य शिक्षण देणे हे महत्त्वाचे आहे. जागतिक आरोग्यविषयक गरजा पूर्ण करण्यात फार्मासिस्टचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. एकूणच फार्मासिस्ट ना मर्यादेबाहेर जावून कार्य करणे आवश्यक आहे. म्हणजे कंफर्ट झोन सोडून काम केल्याशिवाय कार्यात यश मिळणे अशक्य आहे' असे प्रतिपादन विकल्प केम. टेक. प्रायव्हेट. लिमिटेड. (जि. सोलापूर) चे व्यवस्थापकीय संचालक डॉ. नागेंद्र कोंडेकर यांनी केले.

**याप्रसंगी प्राचार्य डॉ. मणियार म्हणाले की, '२०२४ मध्ये या दिवसाची थीम 'फार्मासिस्ट: मिटिंग ग्लोबल हेल्थ नीड्स' ही असून जी फार्मासिस्टच्या भूमिकेला एक नवीन दिशा देते. आरोग्य शिक्षणात फार्मासिस्टचे महत्त्वाचे कार्य आरोग्य शिक्षण देणे आहे. ते रुग्णांना त्यांच्या आरोग्याबाबत जागरूक करण्यास मदत करतात. औषधांचा योग्य वापर, त्यांची मात्रा, डोस आणि संभाव्य दुष्परिणामांविषयी माहिती देणे ही फार्मासिस्टची मुख्य जबाबदारी आहे. अशा प्रकारे ते रुग्णांना सक्षम करतात, त्यांना त्यांच्या आरोग्यासाठी चांगले निर्णय घेण्याची परवानगी देतात' असे सांगून औषध निर्माण क्षेत्रातील अनुभव व्यक्त केले. जागतिक फार्मासिस्ट दिनानिमित्ताने आलेले प्रमुख पाहुणे डॉ. नागेंद्र कोंडेकर आणि डॉ. नामदेव वठमुर्गी यांनी मार्गदर्शन केले. डॉ. नागेंद्र कोंडेकर व डॉ. नामदेव वठमुर्गी हे दोघेही विकल्प केम. टेक. प्रायव्हेट लिमिटेड (जि. सोलापूर) चे व्यवस्थापकीय संचालक म्हणून कार्यरत आहेत.**

गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ फार्मसी मध्ये 'राष्ट्रीय फार्मासिस्ट सप्ताह' उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या उदघाटन प्रसंगी विकल्प केम. टेक. प्रा. लिमिटेड (जि. सोलापूर) चे व्यवस्थापकीय संचालक डॉ. नागेंद्र कोंडेकर हे मार्गदर्शन करत होते. स्वेरीचे संस्थापक सचिव डॉ.बी. पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली व प्राचार्य डॉ. मिथुन मणियार यांच्या नेतृत्वाखाली दि. २३ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर, २०२४ या कालावधीत या सप्ताहाचे आयोजन केले होते.

या सप्ताहानिमित्त कॉलेज मध्ये वेगवेगळ्या स्पर्धांचे आयोजन केले होते. यामध्ये मेडिकल डिटेलिंग, फार्मस्यूटीकल मॉडेल प्रेझेंटेशन, पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन, ॲनिमेशन व्हिडिओ स्पर्धा, पोस्टर प्रेझेंटेशन, प्रश्नमंजुषा, वादविवाद स्पर्धा, रांगोळी आणि मेहंदी या स्पर्धांचा समावेश होता तसेच क्रीडा प्रकारांमध्ये कॅरम आणि बुद्धिबळ या स्पर्धा देखील घेण्यात आल्या. या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला.

या सप्ताहामध्ये सलग तीन दिवस घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमध्ये विजेता आणि उपविजेता निवडण्यात आले. प्रत्येक वर्षी दि.२५ सप्टेंबर रोजी 'जागतिक फार्मासिस्ट दिवस' साजरा केला जातो. फार्मासिस्टचे योगदान ओळखणे आणि त्यांच्या कार्यास प्रोत्साहन देणे हा त्याचा उद्देश आहे. जागतिक फार्मासिस्ट दिन हा दरवर्षी नवीन थीमसह साजरा केला जातो. सकाळच्या सत्रामध्ये पंढरपूर तालुका केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन आणि स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसी, पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य 'मोटार सायकल रॅली'चे आयोजन केले होते. 'जागतिक फार्मासिस्ट दिवस' निमित्त विद्यार्थी प्राध्यापकांना व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पुष्प गुच्छ व भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमाप्रसंगी बोलताना डॉ. नामदेव वठमुर्गी यांनी फार्मसी मध्ये रसायनशास्त्राचे योगदान, त्यांचा जीवन प्रवास, कंपनीबद्दल माहिती, कंपनी स्थापनेपासून ते आत्तापर्यंतची वाटचाल सांगून ड्रग संशोधनामध्ये आपल्याकडे कोणती कौशल्ये असली पाहिजेत, स्टार्ट अप कशापद्धतीने करावा, त्यासाठी आर्थिक नियोजन कसे असावे, काम करताना कार्यप्रणाली कशी असावी, संशोधनाचे महत्व, संशोधनात येणाऱ्या अडचणी व त्यांचे नियोजन, याबद्दल महत्वपूर्ण माहिती देवून स्वेरीच्या शिस्तीचे कौतुक केले. राष्ट्रीय फार्मसी सप्ताह अंतर्गत घेण्यात आलेल्या स्पर्धांच्या विजेत्या आणि उपविजेत्या स्पर्धकांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

या कार्यक्रमाप्रसंगी पंढरपूर तालुका केमीस्ट अँड ड्रगीस्ट असोसिएशनचे अध्यक्ष प्रशांत खलिपे, स्वेरी कॉलेज ऑफ फार्मसी चे सांस्कृतिक कार्यक्रमाचे विभागप्रमुख प्रा. विशाल वाघमारे, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे प्रमुख प्रा. प्रदीप जाधव, डॉ.वृणाल मोरे, डॉ. प्राजक्ता खुळे, प्रा. सुशांत धांडोरे, प्रा. वैभव गायकवाड, प्रा. ऋषिकेश शेळके, प्रा.स्नेहल पाटील, प्रा. लताताई पाटील, प्रा. संध्या गुजरे, प्रा. महादेवी भोसले यांच्यासह इतर प्राध्यापक उपस्थित होते. यावेळी विविध कार्यक्रमांचे सूत्रसंचालन प्रा. हेमंत बनसोडे, दीपाली सागडे व निकिता चव्हाण यांनी केले तर व विद्यार्थिनी समृद्धी सुरवसे यांनी आभार मानले.